# अभ्यास मंडळावर देगलूर महाविद्यालयाचे ४ प्राध्यापक

देगलूर : स्वा रा ती म विद्यापीठाच्या विविध अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून देगलूर महाविद्यालयातील चार प्राध्यापकांची नियुक्ती झाली आहे. लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ.बालाजी कतुरवार व डॉ.संजय देबडे यांना लोकप्रशासन अभ्यास मंडळात काम करण्याची संधी मिळाली आहे. तर मराठी विभागातील प्रा. डॉ. सर्जेराव रणखाम्ब यांना मराठी अभ्यास मंडळात काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे. तसेच प्रा. डॉ रत्नाकर लक्षटे यांना राज्यशास्त्र अभ्यास मंडळात संधी मिळाली. अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, नारायणराव मैलागीरे, सुर्यकांत नारलावार, विलास तोटावार, राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे, देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य एम. एम. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner